# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग-दोन

### सोमवार, दिनांक १९ ऑगस्ट, २०२४/श्रावण २८, १९४६ (शके)

**७०.** सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या शुक्रवार, दिनांक १४ जून, २०२४ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेचे तृतीय (पावसाळी) अधिवेशन गुरुवार, दिनांक २७ जून, २०२४ ते शुक्रवार, दिनांक १२ जुलै, २०२४ पर्यंत घेण्याचे निश्चित करण्यात आले होते.

त्यानुषंगाने मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेच्या तृतीय (पावसाळी) अधिवेशनाकरिता गट क्र. १, गट क्र. २ व गट क्र. ३ च्या तिसऱ्या आठवड्याकरिता मा.सदस्यांकडून प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांपैकी तारांकित स्वीकृत झालेले प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्यात आले असून, सदर आठवड्यातील अतारांकित प्रश्न उचित कार्यवाहीसाठी विभागाकडे पाठविण्यात आले आहेत. तसेच सदर अधिवेशनाच्या पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार जादा आठवड्याकरिता घेण्यात आलेले तारांकित प्रश्न तसेच स्वीकृत अर्धा-तास चर्चेच्या सूचनांपैकी (सर्वसाधारण/प्रश्नातून उद्‌भवणारी) सभागृहात चर्चा न झालेल्या प्रलंबित अर्धा-तास चर्चेच्या सूचना व्यपगत करण्यात आल्या आहेत.

विधान भवन,<br>मुंबई.<br>दिनांक १९ ऑगस्ट, २०२४

**जितेंद्र भोळे**<br>सचिव (१) (कार्यभार)<br>महाराष्ट्र विधानपरिषद

**याची प्रत:**

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.
(२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी तथा जनसंपर्क अधिकारी.
(४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
(५) संगणक कक्ष व एम.के.सी.एल. कक्ष.